ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २८ नोव्हेंबर, १९५६ | अंक ४१

## विविध माहिती

**सौराष्ट्रासाठीं रुंद रुळांची रेल्वे**—सौराष्ट्रांतील रेल्वेचे रस्ते अरुंद रुळांचे आहेत. भारतामधील रुंद रुळांच्या रेल्वे-मार्गाशीं सौराष्ट्रांतील रेल्वे जोडण्याच्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट भागांत रुंद रुळांचा १५८ मैल लांबीचा नवा रस्ता बांधण्याचा विचार चालू आहे. ह्या कामासाठीं जरूर असणारी प्राथमिक पहाणी पश्चिम रेल्वेतर्फे करण्यांत येणार आहे.

**मुंबई सरकारनें मदत नाकारली**—मुंबई राज्यांत कुटुंब-नियोजन केंद्रांची स्थापना करण्यासाठीं भारतीय सरकारनें देऊं केलेली आर्थिक मदत मुंबई सरकारनें नाकारली आहे. कृत्रिम साधनें वापरून कुटुंबनियोजन करण्यास राज्य सरकारचा विरोध आहे. ही गोष्ट आत्मसंयमनानें साध्य करण्यांत यावी, असें सरकारचें मत आहे.

**हिंदी चित्रपटांचा गौरव**—मनिला येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटप्रदर्शनांत हिंदी चित्रपटांना तीन बक्षिसें मिळालीं. एक बक्षीस 'खजुराहो' येथील प्राचीन शिल्पाबद्दलच्या अनुबोधपटाला मिळालें. 'पथेर पंचाली ह्या बंगाली चित्रपटांतील दोघा नटांनाहि दोन बक्षिसें देण्यांत येऊन त्यांचा गौरव करण्यांत आला.

**ब्रिटनचें नवें वीजकेंद्र**—अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें ब्रिटनमधील पहिलें वीज-केंद्र नुकतेंच सुरू झालें. हें वीजकेंद्र बांधण्यासाठीं १·५ कोटी पौंड खर्च आला आहे. अशाच प्रकारचीं आणखी कांहीं केंद्रें बांधण्यांत येणार असून त्यांचा ब्रिटनच्या उद्योगधंद्यांवर व आर्थिक परिस्थितीवर फार मोठा परिणाम होईल. केंद्र पूर्णपणें चालूं झाल्यावर त्यामधून १॥ लाख लोकवस्तीला पुरेल इतकी वीज पुरविण्यांत येईल.

**पाँडीचरींत साखरेचा कारखाना**—पाँडीचरी ह्यापूर्वीच्या फ्रेंच वसाहतींत उद्योगधंदे काढण्याची शक्यता अजमावण्यासाठीं भारतीय सरकारनें आपले दोन अधिकारी पाठविले होते. त्यांनीं अशी शिफारस केली आहे कीं पाँडीचरींत १,२०० ते १,५०० टन ऊंस गाळणारा साखरेचा कारखाना काढण्यांत यावा. कारखान्याला उसाचा पुरवठा करण्यासाठीं ३०० एकर जमीन द्यावी अशीहि सूचना त्यांनीं केली आहे.

**वर्धा स्टेशनाला बक्षीस**—मध्य रेल्वेमार्गावरील वर्धा ह्या स्टेशनला नागपूर विभागांतील सर्वांत स्वच्छ स्टेशन म्हणून ५०० रुपयांचें बक्षीस देण्यांत आलें. हें बक्षीस लागोपाठ दुसऱ्या वर्षी वर्धा स्टेशननें मिळविलें आहे. बक्षिसाची रक्कम देण्याचा समारंभ झाल्यावर सर्व रक्कम स्टेशनांत काम करणाऱ्या कामगारांत वाटून टाकण्यांत आली.

**भूकंपानें बँकेच्या इमारतीला तडा**—दिल्ली व उत्तर भारत ह्या ठिकाणीं नुकताच जो भूकंप झाला त्यामुळें दिल्लींत नव्यानें बांधण्यांत आलेल्या रिझर्व्ह बँकेच्या इमारतीस १०–१२ भेगा पडल्या आहेत. इमारत पांच मजली असून ती बांधण्यास १ कोटी रुपये खर्च आला आहे. एक भेग तर पांची मजल्यांच्या भिंतीला वरपासून खालपर्यंत गेली आहे.

**भारतीय कलाकाराचा दौरा**—भारताचे सुप्रसिद्ध सतारिआ श्री. रविशंकर, हे सध्यां ब्रिटनच्या दौऱ्यावर आहेत. लंडन, ऑक्सफर्ड आणि केंब्रिज ह्या ठिकाणीं ते भारतीय संगीताच्या मैफिलींत सतारवादन करतील. ब्रिटिश नभोवाणीनें त्यांचे कांहीं कार्यक्रम प्रक्षेपित करण्याचें ठरविलें आहे. ब्रिटनच्या दौऱ्यानंतर ते अमेरिकेच्या दौऱ्यावर जातील.

**मेटुर येथें कागदाचा कारखाना**—मेटुर येथें अगर मलबार-मध्यें खाजगी भांडवलाच्या साह्यानें कागदाचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं ३॥ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. मलबारमध्यें बांबू विपुल प्रमाणांत मिळणें शक्य असल्यानें हा कारखाना तेथेंच काढण्यांत यावा असें जर्मन तज्ज्ञांचें मत आहे.

**हंगेरीनें मदत स्वीकारली**—हंगेरींतील राजकीय दंगलींत सांपडलेल्या गरजू लोकांना मदत म्हणून अमेरिकेनें २ कोटी डॉलर्सची मदत देऊं केली होती. ही मदत घेण्यास हंगेरीचें सरकार प्रथम तयार नव्हतें. पण आंतरराष्ट्रीय रेडक्रॉसतर्फे मदतीचें वांटप होणार असेल तर ती स्वीकारण्याची तयारी आतां दाखविण्यांत आली आहे. रेडक्रॉसच्या पथकाला हंगेरीचें सरकार देशांत येऊं देईल.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**सुएझ कालव्याची दुरुस्ती**—सुएझ कालव्यांत बुडविण्यांत आलेल्या बोटी काढून तो पुन्हां चालू करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे एका डच कंपनीकडे विचारणा करण्यांत आली आहे. डच कंपनीला डेनमार्कची एक कंपनी मदत करणार आहे. ह्यासंबंधीच्या कामाचा अंदाज तज्ज्ञांकडून करवून घेण्यांत येईल. खर्च संयुक्त राष्ट्र-संघ देईल.

**सिंगापूरची बाजारपेठ**—अमेरिकेंतील कापडाच्या धंद्याला वाहिलेल्या एका वृत्तपत्रानें अशी बातमी प्रसिद्ध केली आहे कीं, निर्यात व्यापाराबद्दलच्या बेफिकिरीमुळें भारताची सिंगापूरमधील बाजारपेठ हातची जाऊं पहात आहे. सिंगापूरमधील पुष्कळ व्यापाऱ्यांनीं चीन व रशिआकडून कापड मागविण्याच्या खटपटी चालविल्या आहेत.

**दिल्ली-मथुरा रेल्वेमार्ग**—मध्य रेल्वेच्या दिल्ली ते मथुरा भागांतील रेल्वेचा एकेरी रस्ता कांहीं मैलपर्यंत दुहेरी करण्यांत येणार आहे. नवीन दुहेरी मार्ग सुमारें ४५ मैल लांबीचा होईल. ह्या कामासाठी रेल्वे बोर्डानें १·९९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. हा दुहेरी मार्ग पुरा झाल्यावर दिल्ली व मथुरा ह्यांच्यामधील दळणवळण अधिक सोयीचें होईल.

**रोज ११,००० बालकांचा जन्म**—दिल्ली येथील कुटुंब-नियोजन केंद्राच्या अध्यक्ष श्रीमती लीला पंडीत ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, भारतांत दररोज ११,००० बालकें जन्माला येतात. नव्यानें जन्मास येणाऱ्या मुलांची संख्या अशीच कायम राहिली तर राष्ट्राच्या दृष्टीनें धोक्याची परिस्थिति उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं असें त्या म्हणाल्या.

**झांशीच्या राणीचें स्मारक**—झांशीच्या किल्ल्याजवळ १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांतील पुढारी झांशीची राणी लक्ष्मीबाई ह्यांचें स्मारक उभारण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. भारतीय सरकारनें स्मारकासाठी २५ एकर जमीन राज्य सरकारच्या ताब्यांत दिली आहे. ह्या जागेवर बाग करण्यांत येऊन राणीचा पुतळा उभारण्यांत येणार आहे.


**आंतरराष्ट्रीय बालकनिधि**—आंतरराष्ट्रीय बालकनिधीच्या कार्यकारी समितीनें निधीतर्फे भारतांत अंमलांत येणाऱ्या योजनांसाठी आणखी २,२७,७०० डॉलर्स मंजूर केले आहेत. ही रक्कम धरून भारताला १९५६ सालीं निधीकडून सुमारें १७,४१,७०० डॉलर्स मिळाले आहेत.

**कच्च्या फिल्मचें उत्पादन**—भारतांत कच्च्या फिल्मचें उत्पादन करणारा कारखाना काढण्याच्या दृष्टीनें पूर्व जर्मनींतील एका कंपनीशीं बोलणीं चालू आहेत, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. वाटाघाटी पूर्ण होण्यास कांहीं महिन्यांचा अवधी लागेल. कारखान्याची जागा अद्याप निश्चित झाली नसली तरी उटकमंड येथें तो निघण्याचा संभव आहे.

**भारतामधील बुटांची निर्यात**—रशिआ भारताकडून सुमारें १,१८,०५,००० रुपये किंमतीचे बूट विकत घेणार आहे अशी माहिती लोकसभेंत सरकारतर्फे सांगण्यांत आली. भारतीय बुटांची निर्यात सरकारनें स्थापन केलेल्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत येणार आहे.

**एंजिनिअरिंगच्या यंत्रांचा कारखाना**—पश्चिम बंगालमधील दुर्गापूरजवळ भारी एंजिनिअरिंगच्या कारखान्याला लागणारीं अवजड यंत्रें तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्यासाठी असोसिएटेड सिमेंट कंपनी ह्या भारतीय कंपनीनें दोन ब्रिटिश कंपन्यांचें सहकार्य मिळविलें आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना १९१८.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
राष्ट्राकरितां बचत करा
अधिकृत भांडवल रु. १०,००,०००
वसूल झालेलें भांडवल रु. ७,५८,४००
रिझर्व.........रु. ६,९७,०००
ठेवी...........रु. १,५२,००,०००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा:-फोर्ट, दादर, माहिम, बेळगांव,

किर्लोस्कर
शेंगायंत्रें


या यंत्राकडून दर तासा ७५ ते ८० पोतीं शें फोडली जात असून चालविण्यास ६ ते अश्वशक्ति लागते. य शिवाय लहान प्रमाणा हातानें व पॉवरवर णारीं यंत्रें मिळतात. सविस्तर माहितीसा लिहा.
"कल्याण" पॉवर शेंगा यंत्र
किर्लोस्कर ब्रदर्स, लि., किर्लोस्करवाडी

सांडू
प्रेग-युटेरो
गर्भिणी-गर्भ-रक्षक


दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर लि.
चेंबूर-मुंबई.

# अर्थ

बुधवार, ता. २८ नोव्हेंबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दशमान नाण्याच्या पद्धतीचा प्रसार

जगाच्या बहुतेक भागांत दशमान नाण्याची पद्धत रूढ होऊन बराच काळ लोटला आहे. तथापि ब्रिटिश कॉमनवेल्थच्या राष्ट्रगटांतील देशांनीं मात्र नाण्यांची परंपरागत विभाजनपद्धति अजून सोडलेली नाहीं. अर्थात् कांहीं देश ह्याला अपवाद आहेत. ही विभाजनपद्धति ब्रिटिश पौंडाच्या धर्तीवर आधारलेली होती. तथापि गेल्या कांहीं वर्षांत ह्या राष्ट्रगटांतील देशांच्या सरकारांना दशमानपद्धतीचीं नाणीं वापरणें नि पाडण्याच्या व इतर दृष्टीनें अधिक उपयुक्त होईल असें वाटूं लागलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी सिलोनच्या सरकारनें आपलें चलन दशमानपद्धतीवर आधारलें ही पद्धत अमलांत येण्यापूर्वी सिलोनच्या रुपयांचे १६ आणे व ६४ पैसे अशी विभागणी करण्यांत येत असे. नवीन पद्धतीप्रमाणें सीलोनी रुपयांचे १०० सारखे भाग करण्यांत आले. भारतीय सरकारनेंहि दशमानपद्धतीवर आधारलेलें चलन व्यवहारांत आणण्याचें ठरविलें असून ही पद्धत पुढील वर्षाच्या एप्रिलपासून अमलांत येणार आहे. ह्या पद्धतींत भारतीय रुपया १०० पैशांत विभागला जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सरकारनेंहि दशमान पद्धतीचें चलन सुरू करण्याची कल्पना तत्त्वतः मान्य केली आहे. दक्षिण आफ्रिकेचें पौंडाचें चलन सध्यां पौंड, शिलिंग व पेन्स ह्याच नाण्यांत विभागलें जातें. नव्या पद्धतीचा आधार म्हणून डॉलरला मान्यता देण्यांत आली असून ह्या डॉलरचे १०० भागांत विभाजन करण्यांत येणार आहे. जुन्या पद्धतींऐवजीं नवी पद्धत कशी अमलांत आणावी, ह्यासंबंधीं दक्षिण आफ्रिकेचें सरकार सध्यां विचार करीत आहे. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशांतील चलनपद्धति ब्रिटनप्रमाणेंच आहे. पण कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांनीं दशमान पद्धति अवलंबिण्याचें ठरविल्यापासून ह्या देशांच्या सरकारांनींहि नवीन पद्धत स्वीकारण्याच्या शक्यतेविषयीं चौकशी समित्या नेमल्या आहेत.

पौंडाच्या कक्षेंतील बऱ्याच देशांनीं दशमानपद्धति स्वीकारल्यामुळें ब्रिटनहि ह्या पद्धतीला असलेला आपला विरोध सोडून स्वतःची चलनाची पद्धति बदलण्यास तयार होईल किंवा काय असा प्रश्न उपस्थित होतो. ब्रिटनला दशमानपद्धत स्वीकारलीच पाहिजे अशांतला भाग नाहीं. पौंडाचें विभाजन दशमान पद्धतीनें होत नसल्यामुळें ज्या देशांत ती पद्धत चालूं आहे त्यांच्याशीं व्यवहार करतांना ब्रिटनला अडचणींना तोंड द्यावें लागतें हें खरें. पण त्यामुळें व्यवहार अशक्य होतात असें मात्र नाहीं. तेव्हां केवळ ह्याच कारणामुळें ब्रिटनला सध्यांची पद्धत बदलावी लागेल असें मानण्याचें कारण नाहीं. तथापि दशमानपद्धति सोयीची असल्यामुळें ब्रिटननें ती स्वीकारावी असें जोरानें म्हणतां येण्यासारखें आहे. शिवाय दुसरें असें कीं, कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील प्रमुख देशांनीं दशमान पद्धति स्वीकारल्यामुळें ब्रिटनलाहि कांहीं गुंतागुंतीचे व्यवहार करावे लागणें अपरिहार्य आहे. ह्याचाहि परिणाम ब्रिटनच्या ह्या संबंधींच्या धोरणावर होणें शक्य आहे. ब्रिटिश सरकारला दशमान पद्धतीच्या चलनासंबंधीं विशेष नावड आहे असें दिसत नाहीं. कदाचित् असेंहि होण्याचा संभव आहे कीं, ब्रिटन, न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया दशमानपद्धतीचें चलन आपआपल्या देशांत सुरू करण्याचें धोरण परस्परांच्या विचारानें एकाच वेळीं अवलंबितील. सुमारें एक वर्षापूर्वी ब्रिटननें सायप्रसमधील पूर्वीची चलनपद्धति बंद करून दशमानपद्धति सुरू केली हें लक्षांत घ्यावयास पाहिजे.

## चीनमधील प्रगतीचें मर्म

चीनमधील कम्युनिस्ट सरकारच्या राजवटीखालीं त्या देशाची झपाट्यानें प्रगति होत आहे असें चीनला जाऊन आलेले भारतीय निरीक्षक सांगतात. भारतीय पार्लमेंटचें एक प्रतिनिधि-मंडळ चीनचा दौरा करून परत आलें आहे. प्रतिनिधि-मंडळाचे नेते लोकसभेचे स्पीकर श्री. अनंतशयनम् अय्यंगार हे होते. चीनच्या प्रगतीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, भारताला चीनपासून पुष्कळच शिकण्यासारखें आहे. चीनपुढें असलेले प्रश्न वास्तववादी दृष्टीनें सोडविण्यांत येत असल्यामुळें त्या देशाची प्रगति द्रुतगतीनें होत आहे. त्या देशांत अन्न, वस्त्र आणि आसरा ह्या गोष्टींसाठी फार किंमती द्याव्या लागत नाहींत. विद्यापीठांतील शिक्षण आणि वैद्यकीय मदत ह्या गोष्टी जवळ जवळ विनामूल्य पुरविल्या जातात असें म्हणण्यास हरकत नाहीं. गरीब व श्रीमंत ह्यांचे कपडे एकाच दर्जाचे असतात. वेतनांतील तफावतहि फार नसते. अगदीं खालच्या प्रतीचें काम करणाऱ्या कामगाराला जेवढा पगार मिळतो त्याच्या अवघा २० पट पगार राज्याच्या प्रमुखाला मिळतो. गरीब वर्गाला अधिक सुखसोयी आणि सवलती देण्यांत येतात. ह्या बाबी लोकांना अर्थातच चटकन् रुचतात आणि त्यामुळें देशाच्या विकासासाठी कष्ट करण्यास ते आनंदानें तयार होतात. चीननें भारतापेक्षा बऱ्याच अधिक उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण केलें आहे. देशाचा औद्योगिक विकासाचा पंचवार्षिक कार्यक्रम बराच महत्त्वाकांक्षी आहे. उद्योगधंद्यांत राबणारा कामगारवर्ग संतुष्ट असल्यानें तो संपासारख्या मार्गाचा अवलंब करीत नाहीं. भ्रष्टाचार, नौकरशाही वृत्ति आणि नासधूस ह्यांची संपूर्णपणें हकालपट्टी करण्यांत आली आहे. त्यामुळें चीनमधील नागरिकांचें राष्ट्रीय चारित्र्य नव्यानें उजळा दिल्यासारखें झालें आहे.

## हौस-मॉर्टगेज बँकांच्या स्थापनेचा विचार

भारतामधील मोठ्या शहरांतून राहत्या घरांची टंचाई गेल्या कांहीं वर्षांत खूपच वाढली आहे. ह्याचा अर्थ शहरांतील लोकसंख्या वाढली पण नवीन घरें मात्र बांधलीं गेलीं नाहींत असा आहे; आणि तो बरोबरहि आहे. नवीन घरें बांधण्यास उत्तेजन देण्यासाठी सहकारी हौसिंग सोसायट्यांचा उपयोग करून घेण्यांत येत आहे. तथापि रहात्या जागेच्या टंचाईसंबंधीं विचार करतांना जुन्या घरांच्या दुरुस्तीचा व ती रहाण्यास योग्य स्थितींत

ठेवण्याच्या प्रश्नाचा फारसा विचार केला जात नाहीं. नुकत्याच संपलेल्या पावसाळ्यांत मुंबईसारख्या मोठ्या शहरांतहि बऱ्याच इमारती कोसळल्या आणि त्यामुळें कित्येक नागरिकांना त्याबाहेर व्हावें लागलें. घरमालकांना घरांची दुरुस्ती वेळींच करतां येणें शक्य व्हावें म्हणून मुंबई कॉर्पोरेशन कर्जें देण्याची योजना तयार करीत आहे, असें समजतें. मद्रास सरकारनें ह्याच कामासाठीं प्रमुख अशा शहरांतून हौस–मॉर्टगेज बँका स्थापन करण्याचा विचार चालविला आहे. घरमालकांना दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्यासाठीं अशा बँका स्थापन करण्यांत येणार आहेत. घराचा कांहीं भाग नव्यानें बांधणें जरूर असलें, कांहीं तातडीच्या दुरुस्त्या करणें आवश्यक असलें, अगर घराचें स्वरूप बदलावयाचें असलें तर अशा कामासाठीं लागणारी मोठी रक्कम घरमालकाजवळ नेहमींच असते असें नाहीं. नव्यानें स्थापन करण्यांत येणाऱ्या बँका अशा कामासाठीं लागणारा पैसा कर्जाऊ देणार आहेत. मद्रास राज्यांत सध्यां फक्त चारच शहरांतून अशा प्रकारच्या बँका आहेत. मद्रास, एरोड, तंजावर आणि कोइमतूर हीं तीं शहरें होत. गहाण घरें सोडविण्यासाठींहि ह्या बँका कर्जें देतील. अशा बँकांच्या कार्याचें नियंत्रण करण्यासाठीं एक मध्यवर्ती सेंट्रल हौस–मॉर्टगेज बँक स्थापन करण्याचाहि राज्य सरकारचा विचार आहे.

---

## गुजरातमधील प्रमुख सहकारी संस्था

### ( लेखांक पहिला )

लेखक : श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.
C/o कोऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

महाद्विभाषिक मुंबई राज्यांतील एक सधन, सुपीक आणि बऱ्याच बाबतींत सुधारलेला भाग या दृष्टीनें गुजरातचें वैशिष्ट्य कोणासहि नाकारतां येणार नाहीं. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या भागांत अनेक सुधारणा झालेल्या दिसून येतात. सहकारी चळवळीचें क्षेत्र तर फारच वाढलेलें आहे. सरकारच्या योजनेनुसार या भागांतील कांहीं संस्थांना भेटी देण्याची संधि नुकतीच मला प्राप्त झाली होती. मी जें अवलोकन केलें त्याचा उपयोग महाराष्ट्रांतील सहकारी संस्थांना होण्यासारखा असल्यामुळें 'अर्थ'च्या वाचकांसाठीं मी ही लेखमाला सादर करीत आहें.

### १. दक्षिण गुजरात इंडस्ट्रियल बँक लि., सुरत.

दि. ११–९–४९ रोजीं या बँकेची स्थापना झाली. जिल्हा मध्यवर्ती बँक सुरतेला आहे. परंतु ती फक्त शेतकऱ्यांच्या पतपुरवठ्याकरितां असल्यामुळें विणकर, धंदेवाईक व कारागीर यांच्यासाठीं ही बँक स्थापन करण्यांत आली. सुरत, भडोच, डांग हे जिल्हे व पंचमहाल जिल्ह्याचे कांहीं तालुके या बँकेच्या कक्षेंत येतात. खेड्यांतून चालणारे लहान प्रमाणांतील उद्योगधंदे, सुरतेला मोठ्या प्रमाणांत असणारे यंत्रमाग व हातमाग यांच्या वाढीसाठीं ही बँक कर्जपुरवठा करते. ही मध्यवर्ती इंडस्ट्रियल बँक तर आहेच परंतु एकापेक्षा अनेक जिल्ह्यांतील इंडस्ट्रियल सोसायट्यांना कर्जपुरवठा करीत असल्यामुळें हिला गुजरातमधील प्रादेशिक ( रिजनल ) बँकेचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

सुरतमध्यें यंत्रमागावर काम करणाऱ्या विणकरांची संख्या मोठ्या प्रमाणांत असल्यामुळें या बँकेचा उपयोग त्यांना चांगल्या प्रकारें होत आहे. विणकर, धंदेवाईक, लहान व्यापारी व कारागीर आणि त्यांच्या सोसायट्या यांच्या विकासासाठीं ही बँक प्रयत्न करीत आहे. व्यक्ति आणि सोसायट्या या बँकेच्या भागीदार असून त्यांची संख्या अनुक्रमें ३६७ व ५७ आहे. सभासद असलेल्या संस्थांत विणकर सोसायट्या, फॉरेस्ट लेबर सोसायट्या, सुतार–लोहार काम करणाऱ्या सोसायट्या इत्यादि औद्योगिक संस्थांचा समावेश झालेला आहे.

गेल्या सहकारी वर्षाचे अखेरीस बँकेचें वसूल झालेलें भांडवल रु. २,५३,१५० असून ठेवींची रक्कम रु. ११,२०,६०० आहे. याशिवाय मुंबई सरकारनें साडेपांच लाख रुपयांचें कर्ज त्या बँकेला दिलेलें आहे. बँकेनें रु. १२,६२,३०० चीं कर्जें व्यक्ति व औद्योगिक सोसायट्यांना वांटलीं आहेत. व्याजाचा दर सभासद सोसायटीस ५½ टक्के व व्यक्तिगत सभासदास ६½ टक्के याप्रमाणें आहे. गतवर्षी या बँकेस रु. २८,४९२ निव्वळ नफा झाला. खेळतें भांडवल सुमारें सत्तावीस लाख रुपये आहे.

सरकार लहान उद्योगधंद्यांबाबत व औद्योगिक सोसायट्यांबाबत वेळोवेळीं ज्या योजना आखील त्यांची उत्तम प्रकारें अंमलबजावणी करण्याचें कार्य या बँकेनें अंगिकारलें आहे. श्री. रणछोडदास त्रिभुवनदास पोपावाला हे बँकेचे चेअरमन असून श्री. शांतीलाल सी. मास्टर हे मॅनेजर म्हणून काम पहात आहेत.

### २. सुरत पीपल्स कोऑपरेटिव्ह बँक लि., सुरत

सन १९२२ मध्यें या बँकेची स्थापना झाली. ही बँक नागरी ( अर्बन ) स्वरूपाची असल्यामुळें हिचें कार्यक्षेत्र सुरत शहरापुरतेंच मर्यादित आहे. सुरतेचा रहिवाशी अगर सुरतेंत धंदा करणारी व्यक्ति यांना या बँकेचे सभासद होता येते. अशा सभासदांची संख्या ३,१८९ आहे. सुरत शहरांत बँकेच्या मुख्य कार्यालयाशिवाय आणखी तीन शाखा आहेत. बँकेची आर्थिक स्थिति फारच मजबूत आहे. वसूल झालेलें शेअर भांडवल रु. ३,९७,५५० असून रिझर्व्ह फंड रु. ३,०३,१६२ आहे. खेळतें भांडवल एक कोटी रुपयापेक्षा अधिक आहे. ठेवींची रक्कम ८८ लाखापेक्षा अधिक आहे. यावरून सुरतेंतील नागरिकांचा विश्वास या बँकेवर किती आहे हे दिसून येतें. एका शेअरची किंमत २५ रुपये आहे. तथापि १० रुपये अधिक प्रिमियम देऊन शेअर विकला जात आहे. बँकेंतून कर्ज घेण्याचें प्रमाण ठेवींच्या मानानें फारच कमी आहे. सुमारें ३५ लाख रुपये कर्जाऊ वाटल्यामुळें बँकेजवळ भरपूर ठेवी असतांनाहि नफा फारसा झालेला दिसून येत नाहीं. गतवर्षी रु. ४५,१३९–११–५ नफा झाला. बँकेची आर्थिक स्थिति फारच चांगली असल्यामुळें बँक लोकादरास पात्र झालेली आहे व दिवसेंदिवस बँक भरभराटीला येत आहे.–

श्री. सरदार दावर टी. के. मोदी हे बँकेचे चेअरमन आहेत व डॉ. मोहननाथ केदारनाथ दीक्षित मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---

**कोंबड्यांच्या पैदाशीबाबत संशोधन**—कोंबड्यांच्या जननावर हवा व जमिनीचे गुणधर्म ह्यांचा काय परिणाम होतो ह्यासंबंधीं संशोधन करण्याची योजना मद्रास सरकारनें आखली आहे. संशोधनाचा काळ ५ वर्षांचा आहे. संशोधनासाठीं इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ही संस्था २५,००० रुपयांची मदत देणार आहे.

---

**माधवाश्रम** लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## हिंदुस्थान लिव्हर लि.

[ पूर्वीची लिव्हर ब्रदर्स (इंडिया) प्रायव्हेट लि. ]

### १० रु. च्या शेअरला १६ रु. ८ आ. ह्याप्रमाणें ५,५७,००० ऑर्डिनरी शेअर्सची विक्री

लिव्हर ब्रदर्स (इंडिया) प्रायव्हेट लि. ची स्थापना १९३३ मध्यें झाली; ती युनिलिव्हर्स लिमिटेड लंडनची सबसिडिअरी कंपनी होती. ऑक्टोबर १९५६ मध्यें तिचें इतर तीन प्रायव्हेट कंपन्यांशीं (१ हिंदुस्थान वनस्पति मॅ. कंपनी प्रायव्हेट लि., २ विल्यम गॉसेज अँड सन्स [इंडिया] प्रायव्हेट लि. व ३ जोसेफ क्रॉसफील्ड अँड सन्स [ इंडिया ] प्रायव्हेट लि.) एकत्रीकरण झालें ह्या तीनांहि कंपन्या युनिलिव्हर्स लि. च्या सबसिडिअरी कंपन्या होत्या.

हिंदुस्थान लिव्हर लि. ही कंपनी सनलाइट आणि लाइफबॉय साबण, लक्स टॉयलेट सोप, लक्स सोप फ्लेक्स, रिन्सो सोप पावडर, व्हिम पावडर, डालडा व लोटस छाप वनस्पती, ब्ल्यू बँड मार्गराइन, मार्व्हो कुकिंग मीडिअम, ह्यांचें उत्पादन करते. युनिलिव्हिर गटांतील परदेशांतील कंपन्यांचें कांहीं जिन्नस येथील बाजारपेठेसाठी ती तयार करते, त्यांत पेअर्स साबण, रेक्सोना साबण, इरॅस्मिक शेव्हिंग स्टिक, हिमालय बोके साबण व पावडर, पेप्सोडंट व गिब्ज टुथपेस्ट, कॅलिफोर्निअन पॉपी हेअर ऑईल, इरॅस्मिक कोकोनट हेअर ऑईल, इत्यादींचा समावेश होतो. भारतांतील ३,००० गांवांतील १३,००० घाऊक विक्रेते व स्टॉकिस्ट ह्यांचे मार्फत मालाची विक्री होते. सुमारें २,००,००० दुकानांतून कंपनीचा माल प्रत्यक्ष गिऱ्हाइकांना विकला जातो. कंपनीचे पटावर ६,००० नोकर आहेत. कंपनीचे मुंबई, कलकत्ता, शामनगर (प. बंगाल), गाझियाबाद (उ. प्रदेश) आणि तिरुचिरापल्ली येथें कारखाने आहेत. कंपनीला व तिच्या दुय्यम कंपन्यांना १९५५ मध्यें घसारा काढून व सर्व खर्च भागवून २,४८,९७,७१३ रु. निव्वळ नफा झाला. १,०८,१४,९४४ रु. कर देऊन १,४०,८२,७६९ रु. निव्वळ नफा उरला.

१९५७ मधील नफ्यांतून प्रत्येक भागास १ रु. ६ आ. डिव्हिडंड देतां येईल, म्हणजे ८½% करमाफ डिव्हिडंड सुटेल, अशी कंपनीची अपेक्षा आहे. कंपनीनें आपले प्रत्येकी १० रु. किंमतीचे ५,५७,००० ऑर्डिनरी शेअर्स विक्रीस काढले आहेत. प्रत्येक शेअरची किंमत १६ रु. ८ आ. ठरविण्यांत आलेली असून ती अर्जाबरोबरच भरावयाची आहे. किमान ५० शेअर्ससाठी तरी अर्ज केला पाहिजे; ५० शेअर्सच्या गटानेंच विक्री केली जाईल. उदाहरणार्थ, ५० शेअर्सना ८२५ रु. पडतील, १८० शेअर्सना १,६५० रु. पडतील, १५० शेअर्सना २,४७५ रु. पडतील, वगैरे.

३ डिसेंबर, १९५६ रोजीं अर्ज स्वीकारले जातील व ५ डिसेंबर, १९५६ रोजीं ३ वाजतां अर्ज स्वीकारणें बंद केलें जाईल. शेअर्सच्या खरेदीसाठी बरीच गर्दी होईल, अशी अपेक्षा आहे.

---

**सागरी वहातुकीच्या बोटी**—भारतामधील बोट-वहातूक करणाऱ्या दोन कंपन्यांनीं १२,४०० टन वजनाच्या आणखी दोन बोटी विकत घेतल्या आहेत. सागरी वहातूक करणाऱ्या भारतीय बोटींचें एकूण वजन आतां ५ लाख टनांवर गेलें आहे. देशी व परदेशी गोद्यांत मिळून भारतासाठी आणखी ३६ बोटी बांधल्या जात आहेत.

## पुढे पाऊल

( लेखक: श्री. वा. काळे, पृ. सं. १३१. किं. २ रु. )

रोजच्या व्यवहारांत उपस्थित होणाऱ्या बारीक अडचणी व प्रश्न यांचें विचारपूर्वक विवरण करून मार्गदर्शन करणें हें मागच्या " कण आणि क्षण " या पुस्तकानें जसें, साधलें, त्याच दिशेनें हें खरोखरच ' पुढे पाऊल ' आहे. कारण, यांतील प्रश्न ज्यास्त व्यापक आहेत. विशेषत: ' बॉब केसांचें मोल ', ' मिश्र जीवनांतील खाचखळगे ', ' बॅडमिंटन कोर्टावरील शिष्टाचार ' हे प्रश्न या वीस पंचवीस वर्षांतच निर्माण झालेले व दिवसेंदिवस ज्यास्त विचार करण्यास लावणारे ठरतील. ' समाजाच्या ऱ्हासाची हाकाटी, ' ' पाहुण्यांनो ! यजमानाचा चष्मा लावा ' ' खरी व खोटी काटकसर ' हे प्रश्न सनातन आहेत. तेव्हां पुढेहि त्या चर्चेची जरूरी आहेच. उपयुक्त, पण ललितखात्यांत जमा न होणारे विषय घेऊन मनोरंजक होतील अशा तऱ्हेनें मांडणें, ही श्री. काळे ह्यांची हातोटी आतां सर्वमान्य झालीच आहे.

—डॉ. कमलाबाई देशपांडे

---

**भारतीय मिठाची निर्यात**—भारत व इंडोनेशिआ ह्यांच्या दरम्यान झालेल्या कराराप्रमाणें इंडोनेशिआ भारताकडून ५०,००० मेट्रिक टन मीठ खरेदी करणार आहे. ही निर्यात स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत येणार असून सर्व मीठ पुढील सालच्या जून महिनाअखेर पाठविण्यांत येईल.

**म्हैसूर सरकार व दारूबंदी**—प्रांतपुनर्रचनेनंतर अस्तित्वांत आलेल्या नव्या म्हैसूरच्या सरकारला दारूबंदीच्या प्रश्नाबद्दल विचार करावा लागणार आहे. नव्या राज्यांत ५ निरनिराळे विभाग आहेत. त्यांतील कांहीं भागांतच सध्यां दारूबंदी आहे. दारूबंदी नसलेल्या भागांतून राज्य सरकारला दरसाल सुमारें ३ कोटी रुपये अबकारी कराच्या रूपानें मिळत आहेत.

**शास्त्रज्ञ हाल्डेन ह्यांचा निर्णय**—सुप्रसिद्ध ब्रिटिश शास्त्रज्ञ मि. जे. बी. एस्. हाल्डेन पुढील वर्षाच्या जुलैपासून भारतांत स्थायिक होण्याचा विचार करीत आहेत. जगाच्या मतानें आक्रमक ठरलेल्या ब्रिटनमध्यें ह्यापुढें रहाण्याची त्यांची इच्छा नाहीं. गेल्या वर्षी ते भारतांत आले असतांनाच त्यांनीं ह्या देशांत कायमचें रहाण्याची मनीषा व्यक्त केली होती.

**रेल्वे वर्कशॉप्सची सुधारणा**—भारतीय रेल्वेच्या सात विभागांच्या सिग्नलिंगच्या वर्कशॉप्सची पुनर्घटना करून तीं अद्यावत् पद्धतीची करण्याची योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली आहे. ह्या कामासाठी ५ वर्षांत २० कोटी रुपयांची नवी यंत्रसामुग्री आणावी लागेल. त्याशिवाय पुनर्घटनेसाठी १२५ लाख रुपये लागतील.

**सहकारी संघटनांची मिळवणी**—आंध्र आणि तेलंगणांतील विणकरांच्या सहकारी संघटनांची मिळवणी करून एकच नवी संघटना स्थापन करण्यांत येणार आहे. मिळवणी बहुधा पुढील मार्चपर्यंत करण्यांत येईल. दोन्ही संघटनांत असलेल्या ५ लाख सभासदांच्या गरजा त्यामुळें अधिक चांगल्या रीतीनें भागविल्या जातील.

**टाटांच्या कारखान्याचा विस्तार**—टाटांच्या पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करून पोलादाचें उत्पादन दुप्पट करण्याच्या बांधकामांतील एक पंचमांश भाग पुरा झाला आहे. सर्व बांधकाम पुरें करण्यासाठी १३ कोटी डॉलर्स खर्च येईल. विस्ताराची योजना अमेरिकन कंपनीकडून पुरी करून घेण्यांत येत आहे. तिचें काम गेल्या डिसेंबरमध्यें सुरू झालें आहे.

## बँकनोकरांच्या महागाई भत्त्यांतील कपात कायदेशीर ठरली

### रहाणीच्या खर्चाच्या सरासरी इंडेक्सनंबरबाबत लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा

गेल्या वर्षांच्या सहामाही रहाणीच्या खर्चाचा सरासरी इंडेक्स नंबर १३३·८६ होता, त्याचा पूर्ण अंक करून तो १३४ धरण्यांत यावा अशी बँकनोकरांची मागणी लेबर अपेलेट ट्रायब्यूनल ऑफ इंडियानें गेल्या आठवड्यांत फेटाळून लावली. त्याचा अर्थ, गेल्या जानेवारीपासून बँकांनीं नोकरांच्या महागाई भत्त्यांत शास्त्री अवार्डप्रमाणें केलेली कपात कायदेशीर ठरली.

शास्त्री योजनेप्रमाणें (बँक अवार्ड कमिशननें ही योजना बदललेली नाहीं) त्यावेळच्या १४४ ह्या इंडेक्स नंबरापेक्षा सहामाही सरासरी इंडेक्स नंबर १० नें वाढला किंवा कमी झाला, म्हणजे महागाई भत्ता वाढावयाचा किंवा कमी व्हावयाचा आहे. कारकुनांच्या बाबतींत महागाई भत्त्यांतील ही घट एक सप्तमांशाइतकी व कनिष्ठ नोकरांचे बाबतींत एक दशांशाइतकी व्हावयाची आहे.

१३३·८६ हा इंडेक्स नंबर १३४ आहे असें मानण्याचें कारण नाहीं, असें अपेलेट ट्रायब्यूनलनें ठरविलें. ट्रायब्यूनलनें १३३·८६ हा इंडेक्स नंबर १३४ ला पुरा धरावा असें म्हटलें असतें, तर बँकांना कपात करण्याचा अधिकार उरला नसता. १० पेक्षा जास्त पॉइंटसनीं इंडेक्स नंबर खाली गेला, तरच बँका कपात करूं शकल्या असत्या आणि १४४–१३४ = १० हा आंकडा १० पेक्षा जास्त नसल्यानें कपात टळली असती. पण १४४–१३३·८६ = १०·१४ हा आंकडा १० पेक्षा जास्त भरल्यानें बँका कपात करूं शकल्या.

---

### बँकांच्या कर्जात वाढ

बँकिंगविषयक प्रचलित प्रश्नांची चर्चा करण्याकरतां अर्थमंत्र्यांनीं कांहीं प्रमुख बँकर्सना बोलाविलें होतें. बँकांच्या कर्जांत होत असलेली वाढ, ठेवींवरील व्याजाचा दर आणि कर्जांवरील व्याजाचा दर ह्यांतील प्रमाण, पोलाद व यंत्रसामुग्री ह्यांच्या मोठ्या आयातीचा देशांतील पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम, सरकारकडून बिलांची रक्कम मिळण्यास लागणारा विलंब, ठेवींत पैशाच्या पुरवठ्याच्या मानानें अल्प वाढ, इत्यादि प्रश्नांची त्यावेळीं चर्चा झाली. ठेवींत व्हावयास हवी तशी वाढ होत नाहीं, मंदीचा मोसम सुरू झाला तरी पैशाची मागणी उतरत नाहीं आणि त्यामुळें कर्जांत वाढ झालेली आढळते, ह्या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविण्यांत आलें. कर्जांचें ठेवींशीं प्रमाण सप्टेंबर, १९५५ मध्यें ५८·७% होतें, तें ऑगस्ट, १९५६ मध्यें ६७·१% वर गेलें. औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा तो एक परिणाम आहे.

**ARTHA**

**(Marathi, Divali Number, price Re. 1/- Poona 4.)**
This substantial Special contains articles on financial and economic matters and particularly on the Co-operative movement. In Maharashtra, Co-operative Sugar Factories and other Co-operative Banks and Societies are being started, From this point of view the articles in this issue are sure to guide the organisations in the right direction.

—Mahratta
16-11-1956

**बँक ऑफ पूना लिमिटेड**

**( शेड्यूल्ड बँक )**

—मुख्य कचेरी : ६५५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

(१) ३६१ सदाशिव, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सोलापूर. (४) सांगली.

—ः व्याजाचे दरः—

**चालू ठेव–अर्धा टक्का. सेव्हिंग्ज–दोन टक्के.**
**२ महिन्यांच्या पुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.**

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिकोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. २,४६,००० |
| ठेवी | रु. १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एन्. एन्. कुलकर्णी, मॅनेजर.

## महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद्

### ( अधिवेशन ८ वें )

महाराष्ट्र चेंबरनें गेल्या २९ वर्षांत सहा परिषदा भरविल्या. त्यावेळीं प्रामुख्यानें मुंबई राज्यांतील मराठी विभागांतील व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांतील प्रतिनिधींनीं एकत्रित येऊन या विभागाच्या विकासाच्या दृष्टीनें भरीव कार्य केलें आहे. औंधचे राजे कै. बाळासाहेब पंतप्रतिनिधि, कै. वालचंद हिराचंद, श्री. घनश्यामदास बिर्ला, श्री. पुरुषोत्तमदास ठाकुरदास, श्री. कस्तुरभाई लालभाई, राजाबहादुर गोविंदलाल शिवलाल, आदि ख्यातनाम व्यक्तींनीं व उद्योगपतींनीं परिषदेचीं अध्यक्षस्थानें भूषवून परिषदेला मार्गदर्शन केलें होतें. मात्र त्यावेळीं कार्यक्षेत्र मर्यादित होतें. आतां सर्व मराठी प्रदेशाची ही प्रातिनिधिक परिषद व्हावी असा आमचा मानस आहे.

या आठव्या महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेचें अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं स्वीकारण्याचें मान्य केलें आहे. मुंबई राज्याचे मुख्य मंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनीं परिषदेचें उद्घाटन करण्याचें स्वागतमंडळाचें आमंत्रण स्वीकारलें असून परिषद ता. १५ व १६ डिसेंबर १९५६ रोजीं मुंबई येथें वालचंद हिराचंद मेमोरियल हॉलमध्यें भरणार आहे.

आतां मराठी प्रदेश एकत्रित येत आहेत. अशा वेळीं आपण सर्वांनीं एकत्र येऊन मराठी प्रदेशाचा पद्धतशीर विकास कसा होईल याचा विचारविनिमय करावा, अडीअडचणींचा विचार व्हावा, त्यांतून मार्ग कसा काढावा व राष्ट्रीय विकासाच्या कार्यांत व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आपापला वांटा कसा उचलावा या सर्व गोष्टींचा विचार करण्याकरितां आपण या परिषदेस उपस्थित रहावें व आपल्या अनुभवाचा, ज्ञानाचा व सहकार्याचा फायदा परिषदेला द्यावा अशी आमची आपणांस नम्र विनंती आहे.

विदर्भ, महाराष्ट्र व मराठवाडा यांतील व्यापारी व कारखानदार या संधीचा फायदा घेऊन एकत्र येतील व परस्पर सहकार्यानें मराठी प्रदेशाच्या विकासाचा भक्कम पाया घालतील अशी आम्हांला आशा वाटते.

दत्तात्रय गणेश मुल्हेरकर }
मनोहर नारायण गोगटे }
कार्यवाह

भालचंद्र दिगंबर गरवारे
स्वागताध्यक्ष


अन्नाचें रहस्य



बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

☆ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ☆

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

☆ सरदारगृह ☆

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

✻ दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ✻

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २ ☆ मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ☆ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | रु. ७,३३,१३५ |
| सेळतें भांडवल ... ... | रु. ६२,००,००० |

उपाध्यक्ष श्री. वा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, ( बी. ए., (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. ) मॅनेजर

## अर्बन सहकारी बँका आणि ट्रस्टच्या ठेवी

सहकारी खात्याचे मंत्रि, श्री. वसंतराव नाईक, ह्यांनीं मुंबईच्या सारस्वत बँकेस गेल्या आठवड्यांत भेट देऊन बँकेच्या संचालक मंडळाशीं मुंबई राज्यांतील अर्बन सहकारी बँकांपुढील प्रश्नांबाबत चर्चा केली. मध्यमवर्गीयांच्या बचतीस प्रोत्साहन देणाऱ्या बँकेच्या योजनांचें मंत्र्यांनीं विशेष कौतुक केलें. चॅरिटेबल ट्रस्टसना आपल्या रकमा शेड्यूल्ड बँकेंत किंवा चॅरिटी कमिशनरनें मान्यता दिलेल्या इतर कोणत्याहि बँकेंत ठेवतां येतात. कित्येक सहकारी बँका शेड्यूल्ड बँकांच्या इतक्या मजबूत असतात, हें सारस्वत बँकेचे अध्यक्ष, श्री. वर्दे, ह्यांनीं मंत्र्यांच्या निदर्शनास आणलें. मजबुतीच्या कांहीं कसोट्या ठरवाव्यात, कीं ज्यांना उतरणाऱ्या बँकांना चॅरिटी कमिशनर मान्यता देऊं शकेल, असें श्री. वर्दे ह्यांनीं सांगितलें. आज वैयक्तिक बँकांची ह्या दृष्टीनें परीक्षा करण्याचें चॅरिटी कमिशनरजवळ कांहींच साधन नाहीं. ह्या संबंधांत बॉंबे स्टेट को. बँक्स असोसिएशन आणि रजिस्ट्रार ह्यांचेमध्यें पत्रव्यवहार चालू आहे. त्याबाबत सरकारी निर्णय लवकरच करण्याचें आश्वासन मंत्र्यांनीं दिलें.

## सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण उद्यां होणार

म्हैसूर सरकार २९ नोव्हेंबर, १९५६ रोजीं कोलारच्या खाणी आपल्या ताब्यांत घेणार आहे. खाणी चालविण्यासाठी एक 'बोर्ड ऑफ मॅनेजमेंट' नेमण्यांत येईल, त्याचे मुख्य मंत्रि हे अध्यक्ष रहातील.

## CO-OPERATION & ACCOUNTANCY DIPLOMA BOARD, POONA

Passed in the whole Examination including those who have passed in one or the other part previously.

**I Class.**

Mehta J. S.

**II Class.**

Bhide M. G., Thakar S. K.

**Pass Class.**

K. A. Venkitachalam., Bhagwat D. R., Desai M. G., Kulkarni B. S., Mody K. C., Nanivadekar V. R., Potdar W. R., Sonatakke N. V., Tewari G. B., Budihal Y. C., Fadia B. P., Patel N. M., Saiyed F. K., Agnihotri N. T., Borse M. P., Duduskar S. S., Kulkarni S. S., N. Bharathan., Patel R. D., Sheth K. C., Sondur B. R., Vani J. T., Chaudhari S. H., Kale B. R., Patel V. V.

**Passed in "Co-operation" Group only**

Karandikar R. P., Sardesai D. R., Khadayate S. B., Tandalekar S. L., Patwardhan G. P., Deshmukh C. M., Sonar S. S.

**Passed in "Accountancy" Group only**

Gadi L. K., Patel A. A., Bateriwala G. D., Chinchani K. J., Gokhale V. B., Gujarathi S. B., Kulkarni S. R., Patan B. A., Bulsara K. N., Garachh N. H., Gosawi R. S., Karpi S. D., Kasar P. R., Mohite H. G., Patil G. C., Vaidya N. M., Kulkarni K. G., Pandit B. D., Pimpale B. N., Wavade B. Y.

**V. Subramanian**
Registrar of Co-operative Societies
Bombay State, Poona, and
Chairman, Co-operation & Accountancy
Diploma Board, Poona-1.


स्थापना सन १९३५ टे. नं. ३४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, (ऑ. ट्रेझरर)
श्री. खंडेराव सावळेराम दौंडकर, सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.
शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. दिवेकी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ४२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.